


# हॅलो प्रभात

नवे विचार...नवी सुरुवात

RNI NO. MAHMAR/2020/79996

▪ संपादक : संजीव शाळगावकर

▪ मुंबई ▪ पुणे ▪ अहिल्यानगर ▪ कोल्हापूर ▪ सातारा ▪ सांगली

पुणे ● वर्ष : ०६ ● अंक : २५३ ● बुधवार, दि. १७ डिसेंबर २०२५ ● किंमत : ३ रूपये ● पाने : ४







## नॅशनल हेराल्ड प्रकरणी

# भाजपाचा खोटा अजेंडा उघड

### हर्षवर्धन सपकाळ

### सोनिया व राहुल गांधींची बदनामी करणाऱ्यानी माफी मागावी

**मुंबई : हॅलो प्रभात**

नॅशनल हेराल्ड प्रकरणी न्यायालयाने दिलेला निर्णय भारतीय जनता पक्षाच्या खोटारडेपणाचा बुरखा फाडणारा आहे. केवळ सोनियाजी गांधी व राहुलजी गांधी यांना बदनाम करण्यासाठी रचलेले एक कुंभाड असल्याचे आज उघड झाले. ईडी सारख्या सरकारी यंत्रणांच्या माध्यमातून विरोधी पक्षांचा आवाज दडपण्याचा भाजपाचा अजेंडा आहे. न्यायालयाच्या निर्णयाने दूध का दूध पाणी का पाणी झाले असून पंतप्रधान नरेंद्र मोदी व भारतीय जनता पक्षाने सोनियाजी व राहुलजी यांची नाहक बदनामी केल्याबद्दल जाहीर माफी मागावी, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे. टिळक भवन येथे पत्रकार परिषदेत बोलताना कॉंग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ



पुढे म्हणाले की, नॅशनल हेराल्ड ही कंपनी स्वातंत्र्य चळवळीच्या वेळी ब्रिटिशांविरोधात लढताना एक अजेंडा चालवण्यासाठी देशप्रेमातून स्थापन केलेली संस्था आहे. या संस्थेच्या स्थापनेसाठी स्वातंत्र्य सैनिकांनी स्वतः पैसे दिले होते. ही संस्था एक वर्तमान पत्र चालवत होती व ना नफा तत्वावर या संस्थेचे काम चालत होते व आहे. स्वातंत्र्यानंतरच्या काळात या संस्थेत काम करणाऱ्या पत्रकार, कर्मचारी यांचे पगार देण्याचा प्रश्न उद्भवला तेव्हा काही व्यवहार झाले पण त्यातून कोणत्याही सभासदाला लाभांश वगैरे आर्थिक लाभ झालेला नाही. पण मनी लॉंडरिंग झाल्याचा आरोप करत भाजपाने खोटे गुन्हे दाखल करण्यास तपास यंत्रणाना भाग पाडले. सोनियाजी व राहुलजी यांना तासनतास चौकशीच्या नावाखाली त्रास देण्यात आला. आज भाजपाचा खोटेपणा उघड झाला आहे, असेही सपकाळ म्हणाले.

महानगरपालिका निवडणुकीच्या रणनितीसाठी दोन दिवस टिळक भवन येथे बैठक संपन्न झाली. यावेळी विधिमंडळ कॉंग्रेस पक्षाचे नेते विजय वडेट्टीवार, कॉंग्रेस कार्य समितीचे सदस्य नसीम खान, प्रदेश उपाध्यक्ष संघटन व प्रशासन गणेश पाटील, प्रदेश उपाध्यक्ष मोहन जोशी, अल्पसंख्याक विभागाचे अध्यक्ष वजाहत मिर्झा, प्रदेश सरचिटणीस गुरविंदरसिंग बच्चर, यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते. बैठकीनंतर प्रसार माध्यमांशी बोलताना कॉंग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले की, राज्यातील २८ महानगरपालिकांच्या निवडणुकांच्या रणनितीवर या बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली आहे. मुंबई महानगरपालिकेसंदर्भात स्वतंत्र चर्चा करण्यात येईल. उद्यापासून इच्छुक उमेदवारांच्या जिल्हा पातळीवर मुलाखती होतील व त्यानंतर २५ व २६ डिसेंबर रोजी राज्य पार्लमेंटरी बोर्डाच्या बैठकीत उमेदवार निश्चित केले जातील. महानगरपालिका निवडणुकीतही आघाडी करण्याचे अधिकार स्थानिक नेतृत्वाला देण्यात आले आहेत. ज्या समविचारी पक्षांचे आघाडीसाठी प्रस्ताव येतील त्यावर निर्णय घेतला जाईल असे सपकाळ यांनी सांगितले.

### कोकाटेंची हकालपट्टी करा

**महायुती सरकारमधील क्रीडामंत्री माणिकराव कोकाटे यांना सदनिका घोटाळ्याप्रकरणी २ वर्षांची शिक्षा जिल्हा न्यायालयानेही कायम ठेवली आहे पण सरकार कोकाटेंना वाचवण्यासाठी आणखी संधी देईल. राहुलजी गांधी व सुनिल केदार यांना शिक्षा होताच २४ तासात त्यांचे खासदारकी व आमदारकी रद्द केली होती पण माणिकराव कोकाटेंना मात्र सरकार वाचवत आहे. सत्ताधारी पक्षातील लोकांना एक न्याय व विरोधी पक्षातील लोकांना दुसरा न्याय लावला जात आहे. सरकारने तात्काळ माणिकराव कोकाटेंची हकालपट्टी करावी अशी मागणी सपकाळ यांनी केली.**

## संक्षिप्त...

### महापालिकेवर महायुतीचाच भगवा

**मुंबई : हॅलो प्रभात**



आगामी महापालिका निवडणुकांचे मैदान महायुतीने विकास कामांच्या बळावर आधीच मारले आहे. मुंबईचा विकास महायुतीच करू शकते हा विश्वास मतदारांना आहे. मतदारांनी महायुतीचा 3.5 वर्षांचा विकासाचा कारभार पाहिला आहे आणि त्याचबरोबर गेल्या 25 वर्षांतील मुंबई महापालिकेतील कारभार पाहिलाय, उबाठा सरकारचा 2.5 वर्षे घरी बसून केलेला खंडणी गोळा करण्याचा कारभार पाहिला आहे. त्यामुळे विकासासाठी मतदारांचा महायुतीलाच आशीर्वाद मिळेल आणि सर्व 29 महापालिकांवर महायुतीचा झेंडा फडकणार असा विश्वास भारतीय जनता पार्टीचे माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन यांनी मंगळवारी व्यक्त केला. भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेमध्ये ते बोलत होते. मराठी माणसांसाठीची शेवटची लढाई आहे असे म्हणत ऊर बडवणा-यांसाठी ही मराठी माणसासाठी ची लढाई नाही तर एका कुटुंबासाठीची शेवटची लढाई आहे अशी टीकाही श्री. बन यांनी केली.

### दारू पाजून दिवसभर अत्याचार

**रत्नागिरी : हॅलो प्रभात**

रत्नागिरी जिल्ह्यातील गुहागरमध्ये एक संतापजनक घटना उघडकीस आली आहे. एका नराधमाने अल्पवयीन मुलीला समुद्रकिनाऱ्यावर नेत तिला मद्य पाजले आणि नंतर तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. इतकेच नव्हे तर त्याने रात्री जबरदस्तीने तिला लॉजवर देखील नेले, ज्यामुळे मोठी खळबळ उडाली आहे. मुलगी रात्रभर घरी न आल्याने तिच्या पालकांनी लगेच पोलिसात मुलगी हरवल्याची तक्रार दिली होती. मात्र दुसऱ्या दिवशी दुपारी ती स्वतःच घरी परतली. मुलीची अवस्था पाहून तिच्या पालकांना धक्का बसला. त्यांनी मुलीकडे चौकशी केल्यानंतर हा धक्कादायक प्रकार समोर आला. या घटनेनंतर गुहागर पोलिसांनी तात्काळ कारवाई करत प्रितेश सुर्वे (वय 29) या नराधमाला अटक केली आहे.

## अनंतराव पवार अभियांत्रिकीचा ग्रंथ दिंडीत सहभाग




**पुणे : हॅलो प्रभात**

पुणे पुस्तक महोत्सव आयोजित ग्रंथ दिंडीमध्ये अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेच्या अनंतराव पवार अभियांत्रिकी महाविद्यालयांचा भारतीय ज्ञानप्रणाली ग्रंथदिंडी २०२५ सहभाग नोंदविला. वाचन संस्कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी, पुस्तकांबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचा भाग म्हणजे पुणे पुस्तक महोत्सव होय. या मोहोत्सवात महाविद्यालयाने भारतीय जलतंत्रज्ञान या विषयावर या ग्रंथदिंडीत जागृती करून सहभाग नोंदविला. भारतीय ज्ञान प्रणाली या संकल्पनेवर आधारित ही दिंडी मॉडर्न कॉलेजमधून सुरू होऊन जंगली महाराज रस्त्याने फर्ग्युसन कॉलेज पुस्तक महोत्सवाचा ठिकाणी पोहोचली. राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकानी या मध्ये उत्स्फुर्तपणे सहभाग नोंदविला. हि ग्रंथ दिंडी यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रमाधिकारी प्रा. आकाश दोडके यांनी योगदान दिले. महाविद्यालयाने याग्रंथ दिंडीच्या माध्यमातून पुणे पुस्तक महोत्सवात सहभाग नोंदविल्या बद्दल अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेच्या सरचिटणीस प्रमिला गायकवाड, प्राचार्य डॉ. सुनील ठाकरे यांनी सर्वांचे अभिनंदन केले.

## तरुणावर कोयत्याने हल्ला

**पुणे : हॅलो प्रभात**

शिरूर तालुक्यातील बोराडे मळा परिसरात एका तरुणावर चाकू आणि कोयत्याने जीवघेणा हल्ला झाल्याची गंभीर घटना समोर आली असून या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. या हल्ल्यात अजय माणिक घेगडे (वय 20, रा. माठ राजापूर, ता. श्रीगोंदा) हा तरुण गंभीर जखमी झाला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, अजय घेगडे हा बोराडे मळा परिसरात असताना अचानक 8 ते 10 जणांच्या टोळक्याने त्याच्यावर धारदार शस्त्रांनी हल्ला केला. हल्लेखोरांकडे चाकू आणि कोयते असल्याची माहिती जखमी तरुणाने पोलिसांना दिली आहे. अचानक झालेल्या या हल्ल्यात आरोपींनी अजयवर सपासप वार केल्याने तो रक्तबंबाळ अवस्थेत जमिनीवर कोसळला. हल्ल्यानंतर आरोपी घटनास्थळावरून पळून गेले. घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी तातडीने धाव घेत जखमी तरुणाला उपचारासाठी शिरूर ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. सध्या त्याच्यावर उपचार सुरू असून त्याची प्रकृती गंभीर असल्याची माहिती सूत्रांकडून देण्यात आली आहे.

## पार्थ पवार यांना वाचवण्याचे प्रयत्न

*शासकीय अधिकाऱ्यांना आधीपासून माहिती ; विजय कुंभार यांचा आरोप*

**पुणे : हॅलो प्रभात**

मुंढवा येथील कथित जमीन घोटाळा प्रकरणात अमेडिया कंपनीसह संबंधित शासकीय अधिकाऱ्यांना सर्व गैरप्रकारांची माहिती आधीपासूनच होती,या प्रकरणात पार्थ पवार यांना वाचवण्याचा प्रशासनाकडून प्रयत्न करण्यात येत असल्याचा गंभीर आरोप सामाजिक कार्यकर्ते विजय कुंभार यांनी पत्रकार परिषदेत केला. या प्रकरणातील आरोपी शितल तेजवानी हिला न्यायालयाने काल न्यायालयीन कोठडी सुनावली असून, पोलिसांनी सादर केलेल्या रिमांड रिपोर्टमधील तपशील अनेक गंभीर प्रश्न उपस्थित करणारे असल्याचे कुंभार यांनी सांगितले.

कुंभार म्हणाले , आतापर्यंत वरिष्ठ शासकीय अधिकाऱ्यांकडून “या प्रकरणाबाबत आम्हाला काहीही माहिती नव्हती” असा दावा करण्यात येत होता. मात्र, पोलिस रिमांड रिपोर्टमध्ये नमूद असलेल्या तारखा, अर्ज आणि पत्रव्यवहार पाहता जिल्हाधिकारी कार्यालयासह महसूल यंत्रणेला या प्रकरणाची संपूर्ण माहिती होती, हे स्पष्ट होते. यासंदर्भात अप्पर जिल्हाधिकारी (कुळ कायदा शाखा) यांना देण्यात आलेल्या पत्राची प्रत त्यांनी सादर केली.

रिमांड रिपोर्टनुसार शितल तेजवानी हिने १० नोव्हेंबर २०२० रोजी पुणे जिल्हाधिकारी कार्यालयात मुंढवा येथील सर्वे नंबर ८८ संदर्भात अर्ज दाखल केला होता. या अर्जात कब्जा हक्काचा सारा स्वीकारून सातबारा उताऱ्यावर नाव नोंदविण्याची मागणी करण्यात आली होती. हा अर्ज १५ डिसेंबर २०२० रोजी तहसीलदार हवेली यांच्याकडे वर्ग करण्यात आला. मात्र, त्यानंतर दीर्घकाळ कोणतीही ठोस कारवाई झाली नसल्याचे नमूद करण्यात आले आहे.



**अमेडिया कंपनीची स्थापना २८ डिसेंबर २०२० रोजी झाली. त्यानंतर १ जून २०२१ रोजी कंपनीच्या वतीने अप्पर जिल्हाधिकारी (कुळ कायदा शाखा) यांच्याकडे अर्ज सादर करून मूळ अर्जावर तातडीने सुनावणी घेण्याची मागणी करण्यात आली. या पत्रानंतर ११ जून २०२१ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयाकडून शितल तेजवानीला खुलासा सादर करण्याचे निर्देश देण्यात आले. तिने २३ जून २०२१ रोजी खुलासा सादर केला.३० डिसेंबर २०२४ रोजी कब्जा हक्काची रक्कम भरल्याचा दावा करण्यात आला असून, त्यावरील पावतीवर महसूल शाखेचा शिक्का असल्याचे सांगण्यात येते. मात्र, प्रत्यक्षात रक्कम भरली गेली की नाही, यावर संशय कायम आहे.**

# उबाठा-मनसे 'युती' होणार हे निश्चित

### राज ठाकरे, संजय राऊत, अनिल परब यांच्यात चर्चा

**मुंबई : हॅलो प्रभात**

महाराष्ट्राच्या राजकारणात एक मोठी घटना घडत असून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे यांची तसेच महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची युती होत आहे. याच आठवड्यात या संदर्भात घोषणा होईल असे उबाठाचे प्रवक्ते संजय राऊत यांनी जाहीर केले.

मंगळवारी दुपारी संजय राऊत आणि आमदार अनिल परब यांनी मनसेचे नेते राज ठाकरे यांची भेट घेऊन युतीबाबत सविस्तर चर्चा केली. युती तर होणार आहे आता जागावाटप किंवा अन्य व्यूहरचना यासंदर्भात राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे चर्चा करतील असेही ते म्हणाले.सध्या राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची रणधुमाळी सुरु आहे. त्यातच राज्य निवडणूक आयोगाने २९ महापालिका निवडणुकांची घोषणा केली आहे. येत्या दि. १५ जानेवारीला महाराष्ट्रातील २९ महापालिका निवडणुकांसाठी मतदान पार पडणार आहे. तर दि. १६ जानेवारीला या निवडणुकांचा निकाल जाहीर केला जाईल. याच पार्श्वभूमीवर सध्या राज्यात राजकीय भेटीगाठी, युती-आघाडी, जागावाटप आणि पक्षांतरच्या घटना वेगाने घडत आहेत. त्यातच आता गेल्या काही दिवसांपासून सातत्याने चर्चा असलेल्या मनसे-शिवसेना युतीबद्दल एक महत्त्वपूर्ण माहिती समोर आली आहे.



महाराष्ट्रात महापालिका निवडणुका जाहीर होताच शिवसेना ठाकरे गटाचे नेते संजय राऊत आणि अनिल परब यांनी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची भेट घेतली. यामुळे या भेटीला विशेष राजकीय महत्त्व प्राप्त झाले आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, संजय राऊत आणि राज ठाकरे यांच्यात जवळपास ४० मिनिटे चर्चा झाली. या भेटीमागचे अधिकृत कारण मतदार यादीतील घोळाविरोधात विरोधी पक्षांनी एकत्र येऊन काढलेल्या मोर्चाच्या नियोजनासंदर्भात असल्याचे बोललं जात आहे. मात्र या भेटीमुळे राज्याच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे. तसेच या भेटीमुळे राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्यात संभाव्य युतीच्या चर्चांना पुन्हा एकदा बळ मिळाले आहे. गेल्या काही महिन्यांपासून ठाकरे बंधूंच्या एकत्र येण्याबाबत राजकीय वर्तुळात अनेक तर्कवितर्क लावले जात आहेत. आता या भेटीनंतर, ठाकरे बंधूंच्या युतीची घोषणा लवकरच होण्याची शक्यता वर्तवली जात आहे आणि त्यासाठीची तारीखही लवकरच जाहीर होईल, असे बोलले जात आहे. आगामी महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ठाकरे आणि मनसे ही संभाव्य युती झाल्यास मुंबईसह राज्यातील अनेक समीकरणे बदलण्याची शक्यता वर्तवली जात आहे. आता याबद्दल ठाकरे गटाचे नेते अनिल परब यांनी भाष्य केले.

### अनिल परब काय म्हणाले?



**मनसे आणि शिवसेना ठाकरे गटाच्या युतीची अधिकृत घोषणा कधी करायची याचा निर्णय दोन्हीही पक्षाचे नेते घेतील. ती तारीख आपल्याला लवकरच कळवली जाईल. सर्व गोष्टी चर्चेत आहेत. चर्चेअंती जेव्हा शेवटचा निर्णय होईल, तेव्हा पत्रकार परिषद घेऊन तुम्हाला कळवलं जाईल. कॉंग्रेसबद्दल काहीही सांगू इच्छित नाही. एकदा याला अंतिम स्वरुप आलं की कळवू. युतीची घोषणा, कोणाबरोबर काय चर्चा, या सर्वांचा जोपर्यंत अंतिम निर्णय होत नाही तोपर्यंत चर्चा सांगितल्या जात नाही. अंतिम निर्णय सांगितले जातात, अशी प्रतिक्रिया अनिल परब यांनी दिली. तसेच निवडणूक आयोगाबद्दल आम्ही लवकरच स्वतंत्र पत्रकार परिषद घेणार आहे. युतीचा निर्णय दोन्ही पक्षाचे नेते एकत्र येऊन आपल्याला कळवतील. जेव्हा निर्णय अंतिम होतील तेव्हा आम्ही कळवू, असेही अनिल परब म्हणाले.**

## ३१ डिसेंबरला ‘इलेक्शन फिवर’

## उमेदवारांच्या खिशाला कात्री

**पुणे : हॅलो प्रभात**

31 डिसेंबरच्या फिवरमध्ये यंदा महापालिकेची निवडणूक पार पडत आहे. प्रत्यक्ष मतदान 15 जानेवारीला असले तरी ऐन निवडणुकीच्या अर्ज दाखल करण्याच्या धामधुमीत 31 डिसेंबर असल्याने कार्यकर्त्यांच्या मेजवानीचा बेत यंदा जोरात होणार आहे. यंदा निवडणुकीच्या काळात 31 डिसेंबर साजरा केला जाणार आहे. आहे. मात्र, त्या दिवशी एकादशी असल्याने अनेकांच्या उत्सवावर व्यक्तिगत निर्बंध येण्याची शक्यता आहे. ऐन निवडणुकीत 31 डिसेंबर आल्याने उमेदवारांच्या खिशाला चांगलीच कात्री लागणार आहे. राज्य निवडणूक आयोगाने सोमवारी (ता.15) राज्यातील 29 महापालिकांच्या निवडणुकीची घोषणा केली. गेल्या काही वर्षांपासून या निवडणूक रखडल्यान कार्यकर्त्यांसह नेत्यांमध्ये नाराजी होती. शिवाय या निवडणुकींची घोषणा कधी होणार? याकडे कार्यकर्त्यांचं आणि नेत्यांचे लक्ष लागून राहिलं होतं. अखेर राज्य निवडणूक आयोगाने निवडणुकीची घोषणा



करत महापालिकेच्या निवडणुकांचा शंखनाद एकदाचा फुंकला . गेल्या काही वर्षांपासून महापालिकेची मुदत संपल्याने गेल्या साडेचार वर्षांपासून प्रशासक राज अस्तित्वात होतो. शिवाय स्थानिक पक्षांसह राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्यांची देखील कुचंबना झाली होती. अखेर राज्य निवडणूक आयोगांकडे या महापालिका निवडणुकांची घोषणा केली . यापूर्वीचा जर या निवडणुकींचा इतिहास पाहिला तर साधारण नोव्हेंबरच्या टप्प्यात या निवडणुका पार पडलेल्या आहेत. त्यामुळे सर्वसामान्यांची दिवाळी ही इलेक्शन फीवरमध्ये पार पडत होती. आता मात्र ही निवडणूक जानेवारीच्या तिसऱ्या आठवड्यात होणार असल्याने काही विशिष्ट वर्गासाठी ही निवडणूक पर्वणी ठरणार आहे.




## नायकापेक्षा खलनायकच श्रेष्ठ

'धुरंधर' मध्ये दिसणारा पाकिस्तान..तिथली अतिशय दरिद्री तसेच अत्यंत श्रीमंत माणसं.. त्या सगळ्यांवर निर्विवाद अधिराज्य गाजवणारा इस्लामी मूलतत्ववाद.. त्याचा सतत संस्कार किंवा भडिमार होणाऱ्या मनाची जी रोगट अवस्था होईल आणि स्वाभाविकपणे अगदी सामान्य गुंडांपासून राजकारणी, लष्करी अधिकारी, पोलिस, दोन वेळच्या अन्नाचीही भ्रांत असलेली भिकारडी माणसे, स्त्रिया, पुरूष, लहान मुले..भारताच्या, हिंदुंच्या, त्यांच्या भाषेत नेमकं सांगायचं तर काफ़ीरांच्या द्वेषाने निरंतर पछाडलेल्या समाजाचे हे चित्रण जसंच्या तसं पाहायला मिळालं.

पाकिस्तानचे माजी पंतप्रधान झुल्फिकार अलि भुट्टो, ज्यांना त्यांच्याच वेळी लष्करप्रमुख असलेल्या जनरल झिया ऊल हक यांनी भ्रष्टाचाराच्या आरोपाखाली फासावर लटकावले, ते भुट्टो जन्मभर आणि कदाचित फासाचा दोर गळ्यात अडकवल्यावरही म्हणाले असतील, की आम्ही भारताशी, हिंदू काफ़ीरांशी एक हजार वर्षे युद्ध करू. ज्या जनरल झिया ऊल हक यांचा उल्लेख या चित्रपटातला आय.एस्.आय्. चा लष्करी अधिकारी बोलताना करतो.

### हिंदूंसाठी काय संदेश आहे

तो एका पकडलेल्या भारतीय मनुष्याला जवळपास निर्वस्त्र करून एका टेबलावर बांधून ठेवून त्याच्या शरीरावर अगदी आवेशाने धारदार शस्त्राने वार करीत त्याच्या शरीरातून वाहणारे रक्त पाहात म्हणतो,'जनरल झिया ऊल हक म्हणायचे, तसे भारतावर एक हजार वार करून त्याचं रक्त सतत वहात राहील, असं काम करणं हेच आपलं उद्दिष्ट असायला हवं. त्या आसन्नमरण असलेल्या हिंदू मनुष्याला होणाऱ्या प्राणांतिक वेदना आपल्या मनात भयंकर संताप, अत्यंतिक दुःख आणि सतत सतत सलणारी वेदना निर्माण करतात. हे काफ़ीर हाल हाल करून संपवायला हवेत. ते तसे संपवण्यासाठी पाकिस्तानमधला प्रत्येक मनुष्य त्यांनी घडवला आहे, हा संदेश महत्त्वाचा आहे !

### नरडीचा घोट घेण्याची परंपरा

झुल्फिकार अलि भुट्टो यांना फासावर लटकावणारे जनरल झिया ऊल हक, त्यांच्या लष्करी हेलिकॉप्टरमधे स्फोट घडवून चिंधड्या उडवणारे त्यांच्याच लष्करातले गद्दार, नंतर सत्तेत आलेल्या बेनझीर भुट्टो, त्यांना गोळ्या घालून ठार मारणारे दहशतवादी, त्यानंरचा भारतावर कारगिल युद्ध लादणारा लष्करप्रमुख मुशर्रफ, तो परागंदा झाल्यावर सत्तेत आलेला कयानी, त्याच्या डोक्यावर पाय ठेवून आता पाकिस्तानचा सर्वेसर्वा झालेला फिल्डमार्शल असीम मुनीर या सर्वांनी एकमेकांच्या नरडीचा घोट घेण्याची परंपरा अगदी निष्ठेने चालू ठेवली असली, तरीही या सर्वांमध्ये एकच प्रेरणा समान होती, ती म्हणजे भारताचा, हिंदूंचा सर्वनाश करणं हेच आमचं एकमेव धार्मिक कर्तव्य आहे ! मुंबईत अवघे दहा दहशतवादी कराचीहून लॉचमधून पाठवून त्यांनी केलेल्या गोळीबारात १६७ निष्पापांचे प्राण घेणाऱ्या दहशतवाद्यांना सॅटेलाईट फोनवरून सूचना देणारा लष्करी अधिकारी आणि त्या गोळीबारात मरणाऱ्या भारतीयांना पाहून जश्न मनवणारा त्यांच्या कंट्रोल रूममधला राक्षसी कंपू आपण जेव्हा पडद्यावर पाहतो, तेव्हा आपल्या मनात येणारा संताप, या राक्षसांचा सूड घेण्याची भावना जशी आपल्या मनात येते, तशी भारताच्या त्यावेळच्या सत्ताधीशांच्या मनात का आली नाही,या जाणीवेने आपण आतल्या आत धुमसत राहतो.

दहशतवाद्यांनी भारतावर केलेली असंख्य आक्रमणे, त्यात त्यांनी केलेल्या शेकडो निष्पाप भारतीयांच्या निर्घृण हत्या, त्या दुःखद रक्तरंजित घटनांची भारतीयांमध्ये प्रत्येकवेळी उमटलेली संतप्त प्रतिक्रिया, त्यानंतर आपल्या राज्यकर्त्यांनी पाकिस्तानला पाठवलेले गुळमुळीत निषेधाचे खलिते आणि दहशतवादापुढे शेपूट घालणारे आपलेच राज्यकर्ते आपण वर्षानुवर्षे सहन केलेत.

पण, आता पाकिस्तानात घुसून त्यांनी पहलगामला धर्म विचारून ठार मारलेल्या सत्तावीस हिंदूंच्या दुर्दैवी हत्यांचा सूड घेणारा भारत, लाहोरजवळ राक्षसी दहशतवाद्यांची पैदास करणाऱ्या मरकझ़ या इमारतीवर अचूक हल्ला करून आपल्या भारतीय वायू दलाच्या जवानांनी काही क्षणात झोपेतच जन्नतमधे धाडलेले शंभरापेक्षा जास्त दहशतवादी..त्यांना जन्नतमधे साथसंगत करण्यासाठी सोबत पाठवलेले दहशतवादी हाफ़िज सईदचे सगळे कुटुंब, हे पाहताना प्रेक्षकांच्या मनात आता बदललेला भारत जागा होतो. चित्रपटात हे दृश्य नसले तरी तो पाहताना आपण नुकत्याच पाहिलेल्या भारतीय लष्कराच्या पराक्रमाचे आणि आताच्या आपल्या सन्माननीय पंतप्रधानांच्या कणखरपणाचे सतत स्मरण होत राहते.

खोट्या भारतीय चलनी नोटा छापून ते कोट्यवधी रुपये भारतीय अर्थव्यवस्थेत आणण्याचे पाकिस्तानचे मार्ग, त्यांना यासाठी मदत करणारे भारतातील गद्दार, त्यामुळे अक्षरशः मोडकळीस आलेली आपल्या देशाची अर्थव्यवस्था आणि आपल्या सरकारने अचानक केलेल्या नोटबंदीने या कारस्थानाला दिलेला पूर्णविराम, हे पाहताना आपल्याला नोटबंदीच्या निर्णयाचे एक कारण असलेल्या पडद्यामागील घटनाक्रमाचे आकलन होते. पाकिस्तानात शिरकाव करून लियारीत गुन्हेगारी साम्राज्य असलेल्या डकैत रहमानीचा विश्वास संपादन करणारा भारतीय गुप्तचर, त्याने भारतात २६/११ च्या हल्यासाठी दहशतवाद्यांना दिलेल्या शस्त्रास्त्रांचा पुरवठा करणाऱ्या रहमानीचा लावलेला निकाल पाहून आपण चित्रपट गृहातून बाहेर पडताना 'धुरंधर-२' केव्हा पहायला मिळणार,याची उत्कंठा मनात ठेवूनच निघतो.

### पूर्वीचे गुडघे टेकू राज्यकर्ते

भारताच्या यापूर्वीच्या राज्यकर्त्यांची पाकिस्तानसमोरची गुडघेटेकू पराभूत मनोवृत्ती आणि आता त्यांनी आपल्या निष्पाप नागरिकांच्या हत्या केल्यास त्याच्या कित्येक पट दहशतवादी तिथे घुसून त्यांना जन्नत नसीब व्हावी, यासाठी तात्काळ ठार मारण्यासाठी तत्पर असलेले आपले आताचे पराक्रमी लष्कर आणि कणखर राज्यकर्ते हे खूप मोठे अंतर आपल्याला समजते. बदललेला भारत आणि स्वत्व जागृत होण्यापूर्वीचा गलितगात्र भारत यातलं अंतर समजण्यासाठी धुरंधर बघायलाच हवा, नव्हे,लवकरात लवकर बघावाच.

# पृथ्वीराज चव्हाण? छे.. संजय राऊतच





**हॅलो प्रभात**

माजी मुख्यमंत्री, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पृथ्वीराज चव्हाण सध्या हवेत गोळ्या मारायला शिकलेत. खरे म्हणजे ही जागा पूर्वी उबाठा गटाचे प्रवक्ते संजय राऊत यांच्याकडे होती, पण फेकाफेकी करून, काहीतरी भाकिते करून चर्चेत राहण्याची नसती उठाठेव म्हणा किंवा अवदसा या पृथ्वीराजबाबांना आठवली की काय? असे म्हणण्याची वेळ आली आहे.

सातारा जिल्ह्यातील पण पूर्वी देशभरात आणि आता राज्यभरात प्रभाव आलेले प्रामाणिक, निष्कलंक नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी गेल्या आठ दिवसात दोनदा दि. १९ डिसेंबररोजी देशात नव्हे तर जगात मोठी उलथापालथ होणार अशा भाकिताचा पुनरुच्चार केला. त्यांच्या भविष्यवाणीला केवळ दोन - तीन दिवस राहिले आहेत. पृथ्वीराज चव्हाण अत्यंत गांभीर्याने बोलणारे, विचार करणारे, वागणारे, स्पष्ट बोलणारे आणि कोणाची विनाकारण भीड न बाळगणारे काँग्रेसचे नेते आहेत. हे नेतेपण त्यांना पिढ्यानपिढ्यानी मिळालेले आहे. आई,वडील काँगेसचे निष्ठावान होते. पृथ्वीराज चव्हाण हे सुद्धा काँग्रेसचे निष्ठावान आहेत. आज त्यांना ज्या प्रकारे काँग्रेस हायकमांड वागणूक देत आहे, ते पाहता चव्हाण काँग्रेसच्या विरोधात जाणार नाहीत. मात्र, ते हळूहळू निवृत्तीच्या दिशेने वाटचाल करतील, असेच संकेत आहेत.

**पृथ्वीराजबाबांचे भाष्य :** मूळ विषय आहे तो त्यांनी केलेल्या भाष्याचा, त्यांनी केलेले भाष्य ते पुरावा किंवा काही घटनांच्या आधारावर करतात. त्यासाठी त्यांनी 'एपस्टीन फाईल' चा दाखल दिला आहे. सुमारे तीनशे गिगा बाईट एवढा मजकूर तपासणे आणि नंतर तो जाहीर करणे हा विषय सध्या सुरू आहे. यात जगभरातील अत्यंत महत्वाचे नेते, अभिनेते, संशोधक अशी बरीच मंडळी जेफरी एपस्टीन याचे नित्याचे ग्राहक होते. त्यांची यादी, फोटो, विमानाचे जाणे, येणे, व्हीडिओ, मेल असा बराच मजकूर यात आहे. जेफरी एपस्टीन आहे कोण ? हा प्रश्न विचारायचे कारण नाही. कारण बऱ्याच जणांना जेफरी एपस्टीन नक्कीच माहिती असेल. तो आता या जगात नाही. त्याला २०१९ सालात अटक करण्यात आली होती. लहान मुलांचे लैंगिक शोषण, ड्रग्ज आणि अनेक अनैतिक, बेकायदेशीर धंद्यात तो जागतिक पातळीवर काम करत होता.

**ताकतवान ग्राहक मंडळी :** त्याचे ग्राहक आणि त्याच्या माध्यमातून काम करणारे जागतिक पातळीवरची अत्यंत ताकदवान मंडळी आहेत. जेफरी एपस्टीनला अटक झाल्यावर या मंडळींच्या पायाखालची वाळू सरकली. त्यांनी जेफरी एपस्टीनला तुरुंगात मारले. आता एक प्रवाद आहे, त्याने आत्महत्या केली, असे अमेरिकन सरकारचे म्हणणे आहे. या त्याचा यादीत ट्रम्पपासून इंग्लंडचा राजुमार आणि क्लिंटन दाम्पत्यापासून बिल गेट्सपर्यंत अनेक मंडळी आहेत. या मंडळींनी त्याचा खून केला, हे सांगणारे अनेक पुरावे सध्या दिले जात आहेत. मात्र, अमेरिका आणि विशेषतः ट्रम्प सरकार त्याचा मृत्यू नैसर्गिक

असल्याचेच सांगणे सुरु केले आहे. या विषयापेक्षा अजून बरेच महत्वाचे विषय अमरिकेपुढे आहेत असे ट्रम्प सांगत आहेत.

**ट्रम्प यांच्याबद्दल नाराजी :** मात्र, आता अमेरिकन नागरिक सुद्धा ट्रम्प यांच्यावर नाराज झाले आहेत. सार्वजनिक ठिकाणी त्यांना भले-बुरे सुनावले जात आहे. हा सगळा विषय आता जागतिक झाला आहे. सुमारे ७५ हजार फोटो, २० हजार मेल १९ डिसेंबर २०२५ रोजी सार्वजनिक होणार आहेत. एकेकाळचे ट्रम्पचे सहकारी एलन मस्क यांनी ट्रम्प बरोबर मतभेद झाल्यावर ट्रम्प हे जेफरी एपस्टीन यांच्याकडे जात होते, त्याच्या यादीत ट्रम्प यांचे नाव आहे, असे सांगितले होते. आता ही फाईल, माहिती सार्वजनिक झाल्यावर केवळ अमेरिकेत नाही तर जगात खळबळ माजणार आहे.

**पंतप्रधानपदी मराठी माणूस :** या सगळ्या पार्श्वभूमीवर पृथ्वीराजबाबा दि. १९ डिसेंबर रोजी भारताच्या पंतप्रधानपदी मराठी माणूस होणार, असे अत्यंत निर्धारपूर्वक आणि ठाम भाकीत करत आहेत. याचा दुसरा अर्थ जे पृथ्वीराजबाबा थेट सांगत नाहीत तो असा आहे, किंवा त्यांचा निर्देश भारताच्या पंतप्रधानांच्या दिशेने जातो का ? त्या कागदपत्रांचा आणि देशातील सर्वोच्च नेत्यांना संबंध आहे असे त्यांना सुचवायचे आहे का ते केवळ हवेत गोळ्या झाडत आहेत ? त्यातून या सगळ्या प्रकरणाच्या त्यांच्या माहिती देण्यावर काँग्रेसला काही फायदा होणार आहे का ? या प्रश्नांची उत्तरे ते देऊ शकत नाहीत.

**तर कायदेशीर कारवाई होईल? :** त्यांच्या मुलाखतीनुसार अशी नावे घेणे कायदेशीर कारवाईला सामोरे जाणे आहे. तसेच पंतप्रधान बदलण्याचा काँग्रेसला किंवा त्यांच्या मित्र पक्षाला काही फायदा होणार नाही. हे पण त्यांनी स्पष्ट केले आहे. मग, आरएसएस, नागपूर कनेक्शन , भाजपचा या संदर्भातला विचार हे सगळे केवळ संशयाचे वातावरण निर्माण करण्यासाठी ते अशी भविष्यवाणी करत आहेत का ? तर उत्तर त्यांनाच माहिती. म्हणतात ना, उडाला तर काँग्रेसचा पक्षी.. बुडाला तर भाजपचा बेडूक! असा विचार त्यांचा असावा असे वाटते. एक गोष्ट नक्की, की काँग्रेस पक्षाला पृथ्वीराजबाबांच्या रूपाने काहीही ठोकून देणारा, बिन पुराव्याचे बोलणारा आणि पक्षासाठी हानीकारक असा प्रवक्ता म्हणजेच उबाठाचा संजय राऊत मिळाला आहे हे नक्की.

## १५ वर्षीय कबड्डीपटू मुलीच्या हत्येप्रकरणी निकाल

■ आरोपीला जन्मठेप!

**पुणे : हॅलो प्रभात**

एकतर्फी प्रेमातून १५ वर्षीय राष्ट्रीय कबड्डीपटू मुलीचा निर्घृण खून करणाऱ्या आरोपीला न्यायालयाने जन्मठेप आणि पाच हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली आहे. अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश एस. आर. साळुंखे यांनी हा निकाल दिला. शुभम ऊर्फ ऋषीकेश बाजीराव भागवत (वय २२) असे शिक्षा सुनावण्यात आलेल्याचे नाव आहे. खून झालेल्या मुलीच्या चुलत बहिणीने याबाबत बिबवेवाडी पोलिस ठाण्यात तक्रार दिली होती. ही घटना १२ ऑक्टोबर २०२१ ला बिबवेवाडीतील यश लॉन्स येथे घडली होती. मृत मुलगी आठवीत होती. तिने प्रेमास नकार दिल्याने; तसेच फोनवर बोलणे टाळल्याच्या रागातून आरोपीने तिच्यावर चाकूने २२ वेळा वार करून निर्घृण खून केला होता. आरोपीने मुलीचा गळा



चिरून तिचे धड शरीरापासून वेगळे केले होते, असे तक्रारीत नमूद आहे. 'हा दुर्मिळातील दुर्मीळ गुन्हा आहे. या प्रकरणात एकूण १२ साक्षीदारांनी साक्ष नोंदविली आहे. त्यापैकी प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांनी आरोपीला न्यायालयात ओळखले असून, निर्भीडपणे साक्ष नोंदविली आहे. मृत मुलगी आईवडिलांचे एकुलते एक अपत्य होती' असा युक्तिवाद विशेष सरकारी वकील ॲड. हेमंत झंजाड यांनी केला.



## प्रगतशील बागायतदार तुकाराम सूर्यवंशी यांचे निधन

### पर्यावरण जागृतीसाठी सूर्यवंशी कुटुंबीयांकडून नवा पायंडा

**दौंड : हॅलो प्रभात**

मलठण (ता.दौंड) येथील प्रगतशील शेतकरी, वारकरी संप्रदायातील स्व. तुकाराम सोपान सूर्यवंशी यांचे अल्पशा आजाराने वयाच्या ६८ व्या वर्षी दिनांक ३ डिसेंबर २०२५ रोजी पुणे येथील खाजगी रुग्णालयात उपचारादरम्यान दुःखद निधन झाले आहे. त्यांच्यावर मलठण येथील वैकुंठभूमित शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आलेले आहेत. त्यांच्या निधनाने मलठण व दौंडच्या पूर्व भागात हळहळ व्यक्त केली जात आहे. तुकाराम सूर्यवंशी यांनी शेती मध्ये अनेक यशस्वी प्रयोग राबविले. शेती उत्पादनात वाढ करुन शेती फायद्याची कशी होईल याचा ध्यास घेऊन कार्यरत राहिले. दौंडच्या पूर्व भागात 'भाऊ' या नावाने ओळखले जात. नम्र आणि मनमिळावू स्वभावाने आपल्याशी माणसं जोडण्याची त्यांना कला होती. शिवसेनेचे माजी जिल्हाप्रमुख शरदचंद्र सूर्यवंशी यांचे ते वडील होत, त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. कैलासवासी तुकाराम सूर्यवंशी यांचा तेरावा विधी दि. १५ डिसेंबर रोजी मलठण येथे पार पडला. त्यांच्या स्मरणार्थ सूर्यवंशी कुटुंबाकडून धार्मिक विधी उरकल्यानंतर विविध १५० फळझाडांचे वाटप करून स्मृती जागवल्या.

# देवाभाऊंची रणनीती काय?

**पुणे / पिंपरी-चिंचवड : हॅलो प्रभात**

अनेक वर्ष रखडलेल्या महापालिका निवडणुकांना अखेर मुहूर्त मिळाला असून महापालिका निवडणुकांच्या तारखा जाहीर झाल्या आहेत आणि आगामी महापालिका निवडणुकांमध्ये भाजप आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची शिवसेना जास्तीत जास्त ठिकाणी युतीमध्ये निवडणुका लढणार असल्याचं दिसतंय. पण, याच वेळी गेल्या निवडणुका ज्यांच्या सोबतीन लढल्या त्या उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादीला मात्र महायुतीमध्ये जागा नसेल असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केलंय.

एकीकडे राष्ट्रवादी आणि भाजप दोन्ही पक्षांनी आपल्या अस्तित्वाच्या लढाईसाठी असा निर्णय घेतल्याच म्हटलं जातंय, तर या मागे दादा आणि देवाभाऊ यांची वेगळीच रणनीती असल्याचं समोर येतंय. राष्ट्रवादीला महायुतीत जागा नसेल या मुख्यमंत्र्यांच्या निर्णयानंतर अनेक जण अवाक झाले असले तरी सुद्धा यामागे देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांची वेगळीच रणनीती असल्याचं सांगितलं जातंय.

**यापूर्वी भाजप-**





**राष्ट्रवादी विरोधातच :** पुणे महानगरपालिकेचा विचार केला तर २०१७ मध्ये भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस आमने-सामने होती. यावेळी झालेल्या निवडणुकांमध्ये ८५ जागांवर दोन्ही पक्षांमध्ये काटे-की-टक्कर झाली. यातल्या ५० जागा भाजपनं तर उरलेल्या ३५ जागा राष्ट्रवादी काँग्रेसनं जिंकल्या होत्या. त्यामुळे या पालिका निवडणुकीमध्ये जर महायुती म्हणून राष्ट्रवादी काँग्रेस आणि भाजपनं एकत्र निवडणूक लढली तर यासारख्या ८५ जागांवरती दोन्ही पक्षातला मिळून एकच उमेदवार निवडणूक रिंगणात येईल आणि त्यामुळे आपसूकच महायुतीतला एखादा स्ट्रॉग उमेदवार महाविकास आघाडीला आयता मिळण्याची शक्यता आहे. त्यामुळे अशा

### शिंदेंना चुचकारले, दादांना फटकारले

जागांवर भाजप विरुद्ध 'राष्ट्रवादी' ची अशी लढत झाली तरी शक्यतो विजय हा 'महायुती'चाच व्हावा, अशी रणनीती आखण्यात आली असल्याच्या चर्चा आहे. म्हणजे काय, तर भाजपच्या उमेदवाराचा पराभव झाला तर राष्ट्रवादीचा उमेदवार त्या ठिकाणी विजयी होईल आणि राष्ट्रवादीच्या उमेदवाराचा पराभव झाला तर त्या ठिकाणी भाजपचा उमेदवार विजयी होईल. एकूणच काय तर त्या ठिकाणी महायुतीचा च उमेदवार विजयी होण्याची शक्यता सर्वाधिक राहणार आहे. त्यामुळे विजय आणि पराभव यामध्ये महायुतीची चित आणि पट पण महायुतीचीच असणार आहे.

मागच्या महापालिका निवडणुकीत भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसनं १६२ पैकी जास्तीत जास्त जागांवर एकमेकांसमोर उमेदवार उभे केले होते. त्यातल्या ८५ जागांवर थेट आणि चुरशीची स्पर्धा झाली, ज्यात भाजपनं ५० जागा तर राष्ट्रवादीनं ३५ जागा जिंकल्या होत्या आणि सध्याची प्रभाग रचना ही नव्यानं तयार करण्यात आली असली तरी ती जुन्या प्रभाग रचनेप्रमाणेच आहे. जर महायुती म्हणून एकत्र निवडणूक लढवली असती तर या ८५ जागांवर दोन्ही पक्षांपैकी एका बलवान उमेदवाराला माघार घ्यावी लागली असती आणि तो मजबूत उमेदवार आपोआपच महाविकास आघाडीच्या पदरात पडला असता. याचा विचार करून "दोघांच्या भांडणात तिसऱ्याचाच फायदा नको" या विचारानं पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीत महायुतीतून राष्ट्रवादी काँग्रेसला वेगळं ठेवण्याचा निर्णय घेण्यात आल्याची जोरदार चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.

**स्वतंत्र असले तरी एकत्रच :** आगामी पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीत भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस हे बऱ्याच जागांवर स्वतंत्र उमेदवार उभे करणार आहेत. पण, वरुन वरुन जरी ही एकमेकांच्या विरोधात असले तरी सुद्धा ही लढत मैत्रीपूर्ण स्वरूपाची राहणार आहे आणि एकमेकांसमोर उभे असून सुद्धा दोन्ही पक्षांचं लक्ष विरोधी उमेदवारांना हरवून आपल्या मित्रपक्षाच्या उमेदवाराला जास्तीत जास्त मदत करण्यावर असणार असल्याच बोललं जातंय. ज्या प्रभागांमध्ये भाजपच वातावरण अनुकूल आहे, तिथं राष्ट्रवादी काँग्रेस स्वतःहून माघार घेईल किंवा कमकुवत उमेदवार देईल, तर जिथं राष्ट्रवादीला मजबूत स्थिती आहे, तिथं भाजप मदत करेल.कारण यामागचा मुख्य हेतू भाजप-शिवसेना (शिंदे गट) यांच्या हिंदुत्ववादी मतांमध्ये फूट पडू नये आणि महाविकास आघाडीतल्या मतांमध्ये मात्र मोठ्या प्रमाणात विभाजन घडवून आणणं हा आहे. म्हणजेच काय तर कोणताही पक्ष जिंकला तरी त्याचा फायदा महायुतीला झाला पाहिजे असं थोडक्यात प्लॅनिंग दादा आणि देवाभाऊंनी केलंय, म्हणजे कसं.. निवडणुकीनंतर गरज पडली तर सत्ता स्थापनेसाठी हे तिन्ही पक्ष पुन्हा एकत्र येऊ शकतात, अशी अशी रणनीती आखली गेल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे. या रणनीतीमुळं महायुती आणखी बळकट होऊन महा आघाडी मात्र खिळखीळी होणार आहे, हे आता वेगळे सांगायला नको.

नवे विचार...नवी सुरुवात
दैनिक हॅलो प्रभात

■ दैनिक **हॅलो प्रभात** हे पत्रक, मुद्रक शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक व मालक गणेश बंडा पाटील यांच्याकरिता, मे. कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२ महावीरनगर, सांगली – ४१६ ४१६ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक **हॅलो प्रभात**, कार्यालय, स.न.१४/१५/२/३, फ्लॅट नं.२०, शिवपुष्प, ए पार्क, वडगाव बु., पुणे– ४११०४१. (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले.
■ **पुणे कार्यालय :** १६७७, सदाशिव पेठ, अमित रेसिडेन्सी, एस.पी. कॉलेज जवळ, पुणे-४११०३० ■ **पुणे संपर्क : ८५५१०५५११३**
■ **कोल्हापूर कार्यालय :** एस ९४६, GF-7, गुलमर्ग अपार्टमेंट, सरनाईक कॉलनी, शिवाजी पेठ, कोल्हापूर-४१६००२
■ **सांगली मुख्य कार्यालय :** कल्पकुंज विहार, एस.टी. स्टँड रोड, सांगली. ■ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. (सांगली न्यायकक्षेत)
■ मुख्य संपादक : गणेश पाटील-सावर्डेकर ■ संपादक : संजीव शाळगावकर

हॅलो प्रभात
MY CITY
३
बुधवार, दि. १७ डिसेंबर २०२५

# पुण्यातील येरवडा कारागृहात कैद्यांमध्ये हाणामारी

**पुणे : हॅलो प्रभात** : पुण्यातील येरवडा कारागृहातील एका बराकीत दोन कैद्यांमध्ये वाद झाल्याची घटना घडली. त्यावेळी एकावर फरशीने हल्ला केल्याने त्यामध्ये एक जण जखमी झाल्याची घटना घडली आहे. या घटनेत डोक्यात फरशीच्या प्रहाराने खुनाचा प्रयत्न केल्याप्रकरणी दोघांविरुद्ध येरवडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विशाल नागनाथ कांबळे (वय २८, रा. लक्ष्मीनगर, येरवडा), असे गंभीर जखमी झालेल्या कैद्याचे नाव आहे. तर या प्रकरणी आकाश सतीश चंडालिया (वय ३०, रा. येरवडा), दीपक संजय रेड्डी (वय २७, रा. कामशेत) या दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, येरवडा भागातील एका खून प्रकरणात चंडालियाला अटक करण्यात आली होती. येरवडा कारागृहातील सी. जे. विभागातील बराक क्रमांक १ मध्ये तिघांना ठेवण्यात आले होते. त्यावेळी चंडालिया, रेड्डी व कांबळे यांच्यात वाद झाला. त्यातून सोमवारी सायंकाळी पावणेसातच्या सुमारास चंडालिया, रेड्डी यांनी कांबळे याच्यावर फरशीच्या तुकड्याने हल्ला केला. त्या हाणामारीच्या घटनेमध्ये विशाल नागनाथ कांबळे हा गंभीर जखमी झाला. त्यानंतर विशाल कांबळे याला ससून रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. यात खुनाचा प्रयत्न केल्याप्रकरणी आकाश सतीश चंडालिया व दीपक संजय रेड्डी या दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून, अधिक तपास करण्यात येत असल्याचे येरवडा पोलिसांनी सांगितले.

## रुग्णांना प्रतीक्षा डॉक्टर येण्याची, समस्यांच्या विळख्यात पालिकेचा सिध्दार्थ दवाखाना

# डॉक्टरांच्या गैरहजेरीतच दवाखान्याचा कारभार?

**पुणे : हॅलो प्रभात**

सोमनाथ साळुंके

विविध समस्यांच्या विळख्यात अडकलेल्या विश्रांतवाडी येथील पालिकेच्या सिद्धार्थ दवाखान्यातील वरिष्ठ डॉक्टरच वेळेत हजर राहत नसल्याने येथील सर्व कारभार सांभाळण्याचा भार येथील कर्मचाऱ्यांवर येत असल्याने आलेल्या रुग्णांना या ठिकाणी डॉक्टरची प्रतीक्षा करण्याशिवाय पर्याय राहत नाही. त्यामुळे येथील वरिष्ठ अधिकाऱ्याचा मनमानी कारभार चव्हाट्यावर आला आहे.




आज पुणे शहराची ओळख ही सांस्कृतिक शहरसह स्मार्ट सिटी म्हणून आहे.त्यातच शासकीय व खासगी कंपन्यांचे जाळे शहराच्या अवती भोवती फिरल्यामुळे राज्यासह परराज्यातील नागरिक हे कामाच्या शोधार्थ शहराच्या विविध भागात स्थायिक झाल्याचे चित्र परिसरात पाहायले मिळत असताना सध्या वाढत्या महागाईमुळे सर्वसामान्य जनतेचे कंबरडे मोडले असताना यातून बाहेर पडणे अनेकांना कठीण झाले असतानाच शहरात खाजगी रुग्णालयांनी डोके वर काढले असले तरी पण अशा रुग्णालयांचा होणारा खर्च आवाक्याबाहेरचे असल्याने मोलमजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करणाऱ्या कुटुंबापुढे आजारपणाचा तिढा निर्माण झाला आहे.यामुळे नागरिकांना अन्न,वस्त्र व निवारा या मूलभूत गरजेचे असताना रुग्णालयाची देखील गरज भासू लागली आहे.त्यामुळे समाजातील गोरगरीब व गरजूवंत रुग्णांना चांगले उपचार मिळून त्यांचे आरोग्य चांगले रहावे या उद्देशाने पुणे महानगरपालिका अंतर्गत विविध विभागासह आरोग्य विभाग उभारून त्या अंतर्गत शहरातील विविध भागात छोटे_मोठे रुग्णालय उभारण्यात येऊन अशा रुग्णालयात डॉक्टरासह कर्मचारी देखील रुग्णांची सेवा करत असल्याचे पाहायला मिळत आहे.

शहरातील इतर दवाखान्याप्रमाणेच खऱ्या अर्थाने उल्लेख करावा लागतो तो म्हणजे विश्रांतवाडी भागातील पालिकेचा सिध्दार्थ दवाखाना हा परिसर विशेष करून मोलमजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करणाऱ्या कामगार वर्गाचा म्हणून पाहिला जात असून परिसरात शांतीनगर,राजीव गांधीनगर,भीमनगर आदी भागात कामगार वर्ग मोठ्या प्रमाणात स्थायिक झाल्याने येथील नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने श्री क्षेत्र आळंदी रोड मार्गावर पोलिस चौकीच्या पहिल्या मजल्यावर आरोग्य विभागाच्या वतीने दवाखाना उभारून त्यास सिद्धार्थ रुग्णालय म्हणून त्याचे नामकरण करण्यात आले आहे.पण येथे उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांना प्रामुख्याने मुख्य समस्या जाणवते ती म्हणजे येथील वरिष्ठ डॉक्टरच वेळेत दवाखान्यात हजर राहत नसल्याने येणाऱ्या नागरिकांना तासनतास डॉक्टरची प्रतीक्षा करण्याशिवाय पर्याय राहत नाही. अनेकदा संबंधित डॉक्टरची असलेली खुर्ची रिकामी दिसून येत असल्याने डॉक्टरांच्या मनमानी कारभारामुळे येणारे रुग्ण त्रस्त झाले आहेत.



मागील आठवड्यात काही दिवसापूर्वी रुग्णालयात डॉक्टरच न आल्याने तासनतास प्रतीक्षा करत असलेल्या रुग्णाला दुपारच्या सुमारास येथे कार्यरत असलेल्या सिस्टरकडून इंजेक्शन घेण्याची वेळ आल्याने येथील वरिष्ठ डॉक्टर खरोखरच रूग्णांची सेवा करण्यास सक्षम आहेत का?हा मुख्य प्रश्न रुग्णांना सतावत आहे. विशेष करून यापूर्वी डॉक्टरांच्या निष्काळजीपणामुळे शहरातील विविध रुग्णालयात डॉक्टरांच्या निष्काळजीपणामुळे अनेक निष्पाप रुग्णांना प्राण गमवण्याची वेळ आली असताना संबंधित दवाखान्यात कर्मचाऱ्याच्या हातून नकळत अशा प्रकारची दुर्दैवी घटना घडली तर यास जबाबदार कोण?असा संतप्त सवाल नागरिकांकडून होत आहे.डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली काम करणाऱ्या सिस्टर अथवा नर्स यांना पेशंटला सलाईन लावताना देखील वरिष्ठांची परवानगी घेतल्याशिवाय सलाईन लावता येत नसताना देखील येथील कर्मचारी कोणत्या नियमानुसार येणाऱ्या रुग्णांना इंजेक्शन देत आहे. हा मुख्य प्रश्न अनेकांना पडला आहे. त्यामुळे येथे कार्यरत असलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा भोंगळ कारभार चव्हाट्यावर आला आहे.

येथे येणाऱ्या रुग्णांना अरुंद असलेल्या खोलीमुळे साधे बसण्यास देखील होणाऱ्या गर्दीमुळे जागा शिल्लक राहत नसल्याने त्यांना ताटकळत दवाखान्यात उभे राहण्याशिवाय पर्याय राहत नाही.याबरोबरच दवाखान्यात औषधांचे बॉक्स व बैठक जागाच उपलब्ध नसल्याने येथील साफसफाई करणाऱ्या कर्मचाऱ्यांना असलेले हे साहित्य नाईलाजास्तव जिन्यात ठेवण्याची वेळ येत असल्याने टेरेसवर कामानिमित्त जातांना अनेक नागरिकांना विविध अडचणीस सामोरे जाण्याची वेळ येऊन अनेक नागरिक येथून जाताना पडण्याची घटना अनेकदा घडली आहे. विशेषत पावसाळ्यात असलेल्या टेरेसवर पावसाचे पाणी साचून राहत असल्यामुळे या ठिकाणी साचलेल्या पाण्यात डासांचा प्रादुर्भाव वाढत आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये डेंग्यू,मलेरिया यासारख्या आजाराचे प्रमाण वाढत असल्याने नागरिकांच्या मनात धास्ती निर्माण होते.त्यामुळे ज्यांच्याकडे आपण देवदूत म्हणून पाहतो.त्याच डॉक्टरांच्या निष्काळजीपणामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून असलेल्या दवाखान्यासमोर झाडांच्या फा दयानी वेढा दिल्यामुळे व त्यास नामफलक देखील लावण्यात न आल्याने नवीन रुग्णांना येथील दवाखान्यात येताना तो शोधण्याची वेळ येऊन चकरा मारण्याशिवाय पर्याय राहत नाही.याबरोबरच या ठिकाणी कर्मचाऱ्यांकडून कचऱ्याचे निवारण न करता तो एका कोपऱ्यात साचविला जात आहे.त्यामुळे येथील आवारात घाणीचे साम्राज्य पसरून रुग्णांना दुर्गंधीस सामोरे जाण्याची वेळ येत आहे.

जर गोरगरीब रुग्णांना मोफत उपचार मिळावेत ह्या उद्देशाने पालिका आरोग्य विभागातील दवाखान्याची अशा प्रकारची दुरवस्था झाली असेल तर येथील डॉक्टरसह अनेक पदाधिकारी हे रुग्णांना सेवा देण्यास खरोखरच सक्षम आहेत का? हा प्रश्न अनेकांना सतावत असून डॉक्टरांच्या भोंगळ कारभाराचा फटका जनतेला भोगावा लागत असल्याने अशा मनमानी करणाऱ्या वरिष्ठावर पालिका आरोग्य विभाग कारवाईची काय? भूमिका घेणार हे निर्णायक ठरणार असून दवाखान्याकडे दुर्लक्ष करून वेळेत हजर न राहणाऱ्या वरिष्ठावर योग्य ती कारवाई करण्याच्या मागणीला जोर धरू लागली आहे.यासंदर्भात वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता तो होऊ शकला नाही.

## थोडक्यात पण महत्वाचे



### अनुसया सोशल फाउंडेशनच्या दिनदर्शिकेचे अनावरण

**पुणे : हॅलो प्रभात**

अनुसया सोशल फाउंडेशनच्या वतीने नाताळ व नववर्षानिमित्त २०२६ या वर्षाची दिनदर्शिका फा. राजेश परेरा यांच्या शुभहस्ते अनावरण करून वितरित करण्यात आली. या दिनदर्शिकेत छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या १२ किल्ल्यांचा समावेश करण्यात आला आहे. नुकताच या किल्ल्यांना युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत स्थान मिळाले असून, महाराष्ट्रातील रायगड, प्रतापगड, पन्हाळा यांसह ११ किल्ले आणि तामिळनाडूतील जिंजी किल्ला यांचा त्यात समावेश आहे. सतराव्या शतकात उभारण्यात आलेले हे किल्ले मराठा सैन्याच्या अभेद्य तटबंदी व लष्करी कौशल्याचे प्रतीक असल्याचे दिनदर्शिकेत नमूद करण्यात आले आहे. या किल्ल्यांचा जागतिक वारसा यादीत समावेश होणे ही महाराष्ट्रासाठी अभिमानाची बाब असून, ही माहिती सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी दिनदर्शिकेची निर्मिती करण्यात आली आहे. कार्यक्रमाचे आयोजन माजी नगरसेवक राजेंद्र शिरसाट व राहुल शिरसाट यांनी केले. यावेळी जगदीश साळवे, दिलीप शिरसाट, साहेबराव शिरसाट, किरण पाटोळे, संजय गायकवाड, सतीश चौधरी, निलेश शिरसाट, दयानंद साळवे, फैयाज शेख आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार लुईस केदारी यांनी मानले.

### पुणे म्हाडाच्या ४१८६ घरांसाठीची सोडत पुन्हा लांबणीवर

**पुणे : हॅलो प्रभात**

पुणे म्हाडा मंडळाच्या ४१८६ घरांसाठीची सोडत पुन्हा एकदा लांबणीवर गेली आहे. या घरांसाठी १६ किंवा १७ डिसेंबरला सोडत काढली जाईल, असं पुणे मंडळाने सांगितले होते. मात्र, तांत्रिक बिघाडामुळे ही सोडत रद्द करण्यात आली होती. दरम्यान, यामुळे घरांसाठी अर्ज केलेल्या नागरिकांची प्रतिक्षा वाढली आहे. सुमारे दोन लाख १५ हजार अर्जदारांना सोडतीची प्रतिक्षा आहे. येत्या १-२ दिवसात घरांसाठी सोडतीची नवीन तारीख जाहीर होण्याची शक्यता आहे. सोमवारी सायंकाळी ६ वाजता पात्र अर्जांची प्रारूप यादी म्हाडाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध केली. पुणे महामंडळाच्या घरांसाठी ११ सप्टेंबरपासून नोंदणी सुरु झाली होती. एकूण ४१८६ घरांसाठी ही सोडत जाहीर केली होती. यामध्ये २० टक्के सर्वसमावेशक योजनेअंतर्गत ३२२२ घरांसह १५ टक्के एकात्मिक योजनेतील ८६४ घरांचा सोडतीत समावेश आहे. ४१८६ घरांसाठी सोडतपूर्व प्रक्रिया सुरू झाली. मात्र संगणकीय प्रणालीतील तांत्रिक अडचणींमुळे या प्रक्रियेस दोनदा मुदतवाढ देण्यात आली. ही मुदतवाढ २१ नोव्हेंबरपर्यंत देण्यात आली होती.त्यानंतर पुन्हा मुदत वाढवून ११ डिसेंबर करण्यात आली होती. ही सोडतदेखील पुढे ढकलली. त्यानंतर १६ की १७ डिसेंबरला सोडत काढली जाईल, असं पुणे मंडळाकडून जाहीर केले होते. मात्र, आता तेव्हादेखील सोडत निघणार नसल्याचे सांगितले आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार,दोन लाख १५ हजार अर्जांची छाननी पूर्ण करून त्यांची प्रारूप यादी पूर्ण करण्यास विलंब झाला आहे. त्यामुळे सोडत लांबणीवर पडली आहे.

# नवले पुलावरील अपघातांच्या मालिकेला अखेर पूर्णविराम

## केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची एलिव्हेटेड ब्रिजला तातडीची मंजुरी

- दिल्लीतील उच्चस्तरीय बैठकीत मोठा निर्णय
- प्रांताध्यक्ष सुनील तटकरे यांच्या पुढाकाराने बैठकीचे नियोजन
- रूपाली चाकणकर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश; भूपेंद्र मोरे यांची माहिती

**पुणे : हॅलो प्रभात**

नवले पूल व परिसरात सातत्याने घडणाऱ्या भीषण अपघातांमुळे निष्पाप नागरिकांचे जीव जात होते. या गंभीर व अत्यंत संवेदनशील प्रश्नावर अखेर निर्णायक तोडगा निघाला असून, आज दिल्ली येथे केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री मा. श्री. नितीनजी गडकरी यांच्या समवेत महत्त्वपूर्ण बैठकीत नवले पुलावर तातडीने एलिव्हेटेड ब्रिज उभारण्यास मंजुरी देण्यात आली.

प्रदेशाध्यक्ष मा. श्री. सुनीलजी तटकरे यांच्या पुढाकारातून ही बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत नवले पुलावरील अपघातांची मालिका, वाहतूक कोंडी, नागरिकांचे होणारे बळी आणि सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न सविस्तरपणे मांडण्यात आला.

या संपूर्ण विषयासाठी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा मा. रूपाली चाकणकर यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता. आजच्या बैठकीत संबंधित अधिकाऱ्यांना तात्काळ प्रस्ताव सादर करण्याच्या स्पष्ट सूचना देण्यात आल्या.



या बैठकीत एलिव्हेटेड ब्रिजची मागणी आग्रहीपणे मांडण्यात आली. यावर मा. श्री. नितीनजी गडकरी साहेब यांनी तत्काळ संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांशी दूरध्वनीवरून चर्चा करून एलिव्हेटेड ब्रिजच्या प्रस्तावाला तातडीची मंजुरी दिली. तसेच सेवा रस्त्यांवरील अतिक्रमणे त्वरित हटवून वाहतूक सुरळीत करण्याचे स्पष्ट आदेशही देण्यात आले.

संबंधित विषयाची गांभीर्यता लक्षात घेऊन जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांना गांभीर्यपुर्वक लक्ष देऊन लवकर कार्यवाही करण्याबाबत श्री .नितीनजी गडकरी यांनी सुनावले व त्यानुसार आजच तातडीची बैठक घेऊन त्वरित प्रस्ताव सादर करावा यासाठी त्यांनी निर्वाणीची सूचना दिली. सामाजिक कार्यकर्ते श्री. भूपेंद्र मोरे यांनी या विषयासाठी सातत्याने आंदोलने, निवेदने व प्रशासनाशी संघर्ष करत हा प्रश्न केंद्र सरकारपर्यंत पोहोचवला होता. त्यांच्या प्रयत्नांमुळेच हा ऐतिहासिक निर्णय शक्य झाला, आहे..जनतेसाठी रस्त्यावरची लढाई लढणाऱ्या भूपेंद्र मोरे यांना या त्यांनी केलेल्या विविध आंदोलनाचे यश मिळाले आहे.

बैठकीत सर्व प्रशासकीय प्रक्रिया जलदगतीने पूर्ण करून एलिव्हेटेड ब्रिजच्या कामाला तातडीने सुरुवात करण्यात येईल, असे स्पष्ट आश्वासन मा. श्री. नितीनजी गडकरी यांनी दिले. त्यामुळे नऱ्हे, वडगाव बुद्रुक, आंबेगाव, वारजे तसेच या मार्गावरून प्रवास करणाऱ्या हजारो वाहनचालकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

या बैठकीस मा. श्री. सुनीलजी तटकरे, राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा मा. रूपाली चाकणकर, सामाजिक कार्यकर्ते श्री. भूपेंद्र मोरे, श्री .निलेश चाकणकर,तसेच श्री. सोमनाथ शेडगे उपस्थित होते.

या संवेदनशील प्रश्नावर तातडीने निर्णय घेतल्याबद्दल श्री. भूपेंद्र मोरे यांनी मा. श्री. नितीनजी गडकरी, मा. श्री. सुनीलजी तटकरे आणि मा. रूपाली चाकणकर यांचे जाहीर आभार मानले. जनतेसाठी काहीतरी करू शकलो याचे निश्चित समाधान आहे..ह्या पुलाचे काम पूर्ण होईपर्यंत मी याचा पाठपुरावा करणार असल्याचे श्री .भूपेंद्र मोरे यांनी सांगितले.

# धंगेकरांच्या विरोधात सेवानिवृत्त पोलिस अधिकारी रिंगणात

## पुण्यात राजकारण तापले : कोणत्या पक्षाकडून मिळणार उमेदवारी?

**पुणे : हॅलो प्रभात**

पुणे महानगरपालिकेच्या निवडणुकांची घोषणा होताच शहरातील राजकीय हालचालींना वेग आला आहे. १५ जानेवारीला मतदान तर १६ जानेवारीला निकाल जाहीर होणार असल्याने सर्वच पक्षांनी उमेदवारांच्या तयारीला सुरुवात केली आहे. या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक २४ मधून सेवानिवृत्त पोलिस अधिकारी निवडणूक लढवण्याच्या तयारीत उतरल्याने राजकीय समीकरणे रंगतदार बनली आहेत. प्रभाग २४ मधून भाजपचे निवडणूक प्रमुख गणेश बिडकर तसेच शिवसेना (एकनाथ शिंदे गट) नेते रवींद्र धंगेकर यांचे चिरंजीव प्रणय धंगेकर निवडणुकीच्या रिंगणात आहेत. या दोघांसमोर आता सेवानिवृत्त पोलिस उपनिरीक्षक सुनील पवार यांचे आव्हान उभे ठाकण्याची शक्यता आहे. पुणे पोलिस दलात ३४ वर्षांची सेवा बजावलेले सुनील पवार ३१ ऑगस्ट २०२५ रोजी सेवानिवृत्त झाले. मूळचे रास्ता पेठेतील असलेल्या पवार यांचा परिसरात चांगला जनसंपर्क आहे. पोलिस सेवेत असताना केलेल्या उल्लेखनीय कामगिरीसाठी त्यांना पोलिस महासंचालक पदकाने सन्मानित करण्यात आले आहे. निवडणूक लढवण्याची इच्छा त्यांनी सोशल मीडियावरून जाहीर केली असून, कोणत्याही पक्षाकडून उमेदवारी मिळाल्यास निवडून येण्याचा आत्मविश्वासही त्यांनी व्यक्त केला आहे. “३४ वर्षे खाकीत राहून जनतेची सेवा केली. आता नगरसेवक म्हणून पुणेकरांची सेवा करण्याची इच्छा आहे,” असे मत सुनील पवार यांनी व्यक्त केले आहे. प्रभागात आपली ओळख आणि संपर्क मजबूत असल्याने विजयाची शक्यता असल्याचा विश्वासही त्यांनी दाखवला आहे. मात्र सध्या त्यांची प्रतीक्षा आहे ती केवळ तिकिटाची. दरम्यान, प्रभाग २४ मध्ये इच्छुकांची संख्या वाढल्याने उमेदवारीसाठी चुरस निर्माण झाली आहे. ३४ वर्षांची पोलिस सेवेची पार्श्वभूमी असलेल्या सुनील पवारांना कोणता पक्ष जवळ करतो आणि त्यांना उमेदवारी मिळते का, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.



# रिक्षा चालकाने डोंगरावर गळफास घेऊन संपवलं आयुष्य




**पुणे : हॅलो प्रभात**

पुण्यातील पिंपरी चिंचवडमधून एक धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. सुस गाव परिसरातील डोंगरावर एका व्यक्तीनं गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. गळफास घेतलेला व्यक्ती हा रिक्षाचालक असल्याची माहिती आहे. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. तसेच मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी रूग्णालयात पाठवले. सध्या पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मृत व्यक्तीचे वय साधारण ४० ते ४५ पर्यंत असल्याची माहिती आहे. मृत व्यक्ती रिक्षा चालक असल्याची माहिती आहे. घटनेच्या दिवशी मृत व्यक्ती पिंपरी चिंचवड शहर पोलीस आयुक्तालय हद्दीतील सुस गाव परिसरातील डोंगराळ भागात गेला. डोंगरावर चढून त्यानं आयुष्याचा दोर कापला. झाडाला गळफास लावून रिक्षा चालकाने आत्महत्या केली. या घटनेची माहिती मिळताच बावधन पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. तसेच गळफास घेतलेल्या व्यक्तीचा मृतदेह ताब्यात घेतला. पोलिसांनी मृतदेह थेट शवविच्छेदनासाठी ससून रुग्णालयात पाठवले. रिक्षा चालकाने नेमकी आत्महत्या का केली? आत्महत्या करण्यामागचं कारण काय? याचा तपास पोलिसांकडून सुरू आहे. पुढील तपास पूर्ण झाल्यानंतर पोलीस पुढील कायदेशीर करणार आहेत. दरम्यान, या घटनेनंतर परिसरात खळबळ उडाली आहे.

हॅलो प्रभात
# अहिल्यानगर
जिल्हा विशेष
बुधवार, दि. १७ डिसेंबर २०२५





## थोडक्यात पण महत्वाचे




## दुरावलेले पती-पत्नी लोक अदालतीच्या माध्यमातून पुन्हा एकत्र

**कोपरगांव : हॅलो प्रभात**

अर्जदार व सामनेवाला यांचा विवाह दि. १३ नोव्हेंबर २०१८ रोजी झाला होता. सन २०२० व २०२१ मध्ये त्यांना दोन कन्यारत्ने प्राप्त झाली. संसार सुरू असताना छोट्या-मोठ्या कुरबुरी होत राहिल्या. त्यातून गैरसमज वाढत गेले आणि सन २०२१ पासून दोघेही वेगवेगळे राहत होते. परस्परांतील मतभेद अधिक तीव्र झाल्याने संबंधित दोन प्रकरणे न्यायालयात दाखल करण्यात आली होती. ही दोन्ही प्रकरणे दि. १३ डिसेंबर २०२५ रोजी आयोजित राष्ट्रीय लोक अदालतीत तडजोडीसाठी ठेवण्यात आली होती. यावेळी पॅनल प्रमुख एल. एस. पाढेन व श्रीमती जे. डी. उपरकर, तसेच अर्जदारांच्या विधीज्ञ ॲड. आशा गोंधळे आणि सामनेवाल्यांच्या विधीज्ञ ॲड. सौ. सुजाता पंडित यांनी दोन्ही पक्षकारांचे योग्य समुपदेशन केले. समुपदेशनानंतर दोन्ही पक्षकारांनी आपल्या दोन मुलींच्या उज्ज्वल भवितव्याचा विचार करून परस्पर समझोता करण्यास सहमती दर्शविली. परिणामी, चार वर्षांपासून दुरावलेले पती-पत्नी राष्ट्रीय लोक अदालतीच्या माध्यमातून पुन्हा एकत्र आले असून, आज ते आपल्या मुलींसह एकत्र राहण्यास गेले आहेत. राष्ट्रीय लोक अदालतीच्या माध्यमातून कौटुंबिक वाद सौहार्दपूर्णरीत्या निकाली काढण्याचा हा उपक्रम समाजात सलोखा व कौटुंबिक एकोपा वाढविण्यास निश्चितच प्रेरणादायी ठरला आहे.

## चिमुकल्या प्रियलने साकारला अहिल्यादेवीचा इतिहास

**राहुरी : हॅलो प्रभात**



तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, दिघे वस्ती येथील दुसरीतील विद्यार्थिनी प्रियल प्रमोद दिघे हिने केंद्रस्तरीय वेशभूषा व व्यक्तिमत्त्व सादरीकरण स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला. 'मी अहिल्याबाई होळकर बोलतेय' या विषयावरील तिच्या प्रभावी सादरीकरणाने परीक्षक व उपस्थितांची मने जिंकली. अहिल्याबाई होळकर यांच्या न्यायप्रियता, लोककल्याणकारी धोरणे व स्त्रीसशक्तीकरणाचे विचार तिने आत्मविश्वासाने मांडले. या यशामागे मुख्याध्यापक शिंदे, वर्गशिक्षिका पारेकर व शिक्षकवृंदाचे मार्गदर्शन मोलाचे ठरले. प्रियलच्या यशाबद्दल शाळा व्यवस्थापन, पालक व ग्रामस्थांनी अभिनंदन केले.



## शौर्या गिरमेची व्हॉलीबॉल संघाच्या कर्णधार पदी निवड

**कोपरगांव : हॅलो प्रभात**

श्री शारदा इंग्लिश मिडीयम स्कुल मध्ये इयत्ता १० वी च्या वर्गात शिक्षण घेत असलेली शौर्या रणजित गिरमे हिने १७ वर्षा खालील थ्रीए साइड व्हॉलीबॉल च्या भारतीय संघाच्या कर्णधार पदी धडाकेबाज एन्ट्री मारली. फक्त १५ वर्षाची शौर्याची कामगिरी बघुन सर्वजण आश्चर्य व्यक्त करत आहेत व शौर्याचे सर्वत्र कौतुक होत आहे. एवढ्या लहान वयात भारतीय संघात महाराष्ट्र राज्यातून निवड झालेली शौर्या एकमेव मुलगी आहे.लहानपणा पासुनच खेळाची आवड असलेली शौर्या तिची मोठी बहीण तनिष्का रणजित गिरमे सोबत खेळत शौर्याने व्हॉलीबॉल खेळातली चुणूक दाखवली. तसेच पुढे खेळाचे प्रशिक्षक गौरव डेंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली कठोर, चिवट व सातत्यपूर्ण सराव केला आणि भारतीय संघात थेट कर्णधार पदा पर्यंत मजल मारली. काठमांडू, नेपाळ येथे होणाऱ्या सदर स्पर्धेमध्ये कोपरगावची शौर्या कॅप्टन असल्याने कोपरगावची ख्याती जगभर पसरणार आहे. नुकत्याच अंतरराज्य स्पर्धे मध्ये शौर्याने दाखवलेल्या जबरदस्त खेळा मुळे भारताच्या निवड समितीने तिची थेट कर्णधार पदी निवड केली. शौर्याच्या या उत्तुंग यशामागे तिचे आई, वडिल, बहिण आदींचे मार्गदर्शन लाभले. शौर्याच्या या यशाबद्दल नुकतेच आमदार आशुतोष काळे यांनी तिचे अभिनंदन करत भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहे. या प्रसंगी अमोल गिरमे, अजित कोरके, गुरुराज एच पी गॅस चे सर्वेसर्वा विशाल जगताप, डॉ.घायतदडकर-पाटील, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नगरसेवक पदाचे उमेदवार डॉ.कुणाल घायतडकर, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नगरसेवक पदाचे उमेदवार तथा सामाजिक कार्यकर्ते अमित आगलावे, राजेंद्र तिरसे, महेश झोडगे उपस्थित होते.

## बारामती नगरपरिषद सार्वत्रिक निवडणुक कार्यक्रम अंतिम टप्प्यात

**बारामती : हॅलो प्रभात**

राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार सुरु असलेल्या बारामती नगरपरिषद सार्वत्रिक निवडणुक कार्यक्रम अंतिम टप्प्यात आहे. या निवडणूकीच्या अनुषंगाने शहरांमध्ये ११५ ठिकाणी मतदान केंद्र तयार करण्यात आले आहेत.११५ मतदान केंद्रांवर एकूण १ लाख १ हजार ९९२ मतदार शनिवारी(दि २०) मतदानाच्या दिवशी मतदान करणार आहेत.या निवडणुकीत एकूण २० प्रभागाकरिता एकूण १४५ उमेदवार, अध्यक्ष पदा करिता १४ उमेदवार निवडणूक रींगणात आहेत,अशी माहिती निवडणुक निर्णय अधिकारी डॉ.संगीता राजापुरकर,सहाय्यक निवडणुक निर्णय अधिकारी पंकज भुसे यांनी दिली. सर्व मतदान केंद्रावर बारामती नगरपरिषद मार्फत सर्व व्यवस्था पुरविण्यात आलेल्या आहेत.

# भाविकांच्या सुरक्षिततेसाठी प्रभावी अंमलबजावणी करा

### मुख्य सचिव राजेश अग्रवाल : सिंहस्थ कुंभमेळा नियोजन आढावा बैठक संपन्न

**अहिल्यानगर : हॅलो प्रभात**

विनोद जवरे



नाशिक येथे २०२६-२७ मध्ये होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर शिर्डी येथे येणाऱ्या भाविकांची संभाव्य गर्दी लक्षात घेऊन जिल्हा प्रशासनाने तयार केलेला 'शिर्डी कृती आराखडा' सर्वसमावेशक आहे.भाविकांची सुरक्षा, आरोग्य व वाहतूक नियोजनाला सर्वोच्च प्राधान्य देत या आराखड्याची प्रभावी अंमलबजावणी करावी, असे निर्देश राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी आज येथे दिले. सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पूर्वतयारीचा आढावा घेण्यासाठी शिर्डी येथे आयोजित बैठकीत मुख्य सचिव श्री. अग्रवाल बोलत होते. या बैठकीला नाशिक विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, श्री साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर जिल्हाधिकारी बाळासाहेब कोळेकर व उपविभागीय अधिकारी माणिक आहेर आदी अधिकारी उपस्थित होते. बैठकीच्या सुरुवातीला जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांनी सादरीकरणाद्वारे तयारीचा सविस्तर माहिती सादर केली. नाशिक कुंभमेळ्यासाठी येणाऱ्या एकूण भाविकांपैकी सुमारे २० ते २५ टक्के भाविक शिर्डी व शनिशिंगणापूर येथे दर्शनासाठी येण्याची शक्यता गृहीत धरून प्रशासनाने सूक्ष्म नियोजन केले आहे. यामध्ये वाहतूक, पार्किंग, आरोग्य व आपत्ती व्यवस्थापनावर विशेष भर देण्यात आला आहे. कुंभमेळा कालावधीत शहरात होणारी वाहतूक कोंडी टाळण्यासाठी 'एकात्मिक वाहतूक आराखडा' तयार करण्यात आला आहे. त्यानुसार शहराबाहेर व मंदिरालगत सुमारे ९४ हेक्टर क्षेत्रावर ८ नवीन पार्किंग स्थळे निश्चित करण्यात आली असून, तेथे स्मार्ट पार्किंग व शटल बस सेवेचा समावेश असेल.

आपत्कालीन परिस्थितीमध्ये रुग्णवाहिका व अग्निशामक दलाच्या गाड्या अवघ्या १५-२० मिनिटांत घटनास्थळी पोहोचण्यासाठी 'ग्रीन कॉरिडॉर'ची व्यवस्था करण्यात येणार आहे. तसेच, गर्दीवर नियंत्रण मिळवण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करत संवेदनशील ठिकाणांवर ड्रोन व सीसीटीव्हीद्वारे नजर ठेवली जाईल. भाविकांच्या मदतीसाठी व गर्दी नियोजनासाठी विशेष प्रशिक्षित 'क्राउड मार्शल्स' तैनात करण्यात येणार आहेत. आरोग्य सुविधेच्या दृष्टीने श्री साईबाबा सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल व परिसरातील इतर रुग्णालये सुसज्ज ठेवण्यात येणार असून, अग्निशमन दलासाठी नवीन मल्टीपर्पज वाहने व प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध करून दिले जाणार आहे. प्रशासनाच्या या सर्वंकष नियोजनाचे मुख्य सचिव अग्रवाल यांनी कौतुक करत, सर्व विभागांनी समन्वयाने काम करून भाविकांना सोयी-सुविधा देण्याचे काम करावे, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

## धुमाकूळ घालणारा बिबट्या वनविभागाच्या पिंजऱ्यात

**कोपरगाव : हॅलो प्रभात**



अहिल्यानगर जिल्ह्यातील कोपरगाव वनपरिक्षेत्रातील व कोपरगाव तालुक्यातील पढेगावात धुमाकूळ घालणारा बिबट्या कोपरगाव वनविभागाच्या पिंजऱ्यात जेरबंद झाला आहे. कोपरगाव तालुक्यात अनेक ठिकाणी बिबट्याचा वावर असल्याने, शेती करणे अवघड झाले आहे. कोपरगाव तालुक्यातील पढेगाव शिवारात बिबटया चा वावर आढळला असून अनेक ग्रामस्थांनी बिबटया ला बघितले होते त्यामुळे परिसरात भीती निर्माण झाली होती. सरपंच व ग्रामस्थ पढेगाव यांच्या मागणी नुसार अण्णासाहेब कारभारी शिंदे रा पढेगाव यांच्या शेतात वनविभागाने पिंजरा लावला होता.दि 15 डिसेंबर 2025 रोजी सांयकाळी ७ च्या सुमारास बिबटया पिंजऱ्यात कैद झाला. याची माहिती ग्रामस्थांनी तात्काळ वनविभागाला दिली व वनकर्मचारी तात्काळ पढेगावात हजर झाले. बिबट्याला बघण्यासाठी ग्रामस्थांनी मोठी गर्दी केली.

सदर कार्यवाही उपवनसंरक्षक अहिल्यानगर धर्मवीर सालविठ्ठल,सहा वनसंरक्षक श्री. मिसाळ यांच्या मार्गदर्शनाखाली वनपरिक्षेत्र अधिकारी कोपरगाव निलेश रोडे यांच्या निर्देशानुसार वनपाल भगवान जाधव, वनरक्षक अमोल किंकर , वनरक्षक श्रीमती श्रध्दा पडवळ, वनरक्षक श्रीमती निकीता पगारे, वनपाल सानप, अक्षय बडे, राहूल कानडे, विलास डगळे यांनी पिंजरा लावून बिबटया बंदिस्त करून पूर्ण केली.

## धुमाळचे विद्यार्थी राज्यस्तरीय क्रिकेट स्पर्धेत

**राहुरी : हॅलो प्रभात**



अहिल्यानगर जिल्हा क्रीडा कार्यालय आयोजित शालेय जिल्हास्तरीय टेनिस क्रिकेट स्पर्धेत लोकनेते रामदास पाटील धुमाळ कला विज्ञान व वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालय 17 वर्ष वयोगट मुलांच्या संघाने प्रथम क्रमांक पटकावत पुणे विभाग स्तरावर निवड झाली तर 19 वर्षे मुलांच्या संघाने जिल्हास्तरीय स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकवला. अहिल्यानगर टेनिस क्रिकेट असोसिएशन आयोजित जिल्हास्तरीय स्पर्धेतून सहा खेळाडूंची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली. या गुणवंत खेळाडूंचे महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. अनिता वेताळ, उप प्राचार्य डॉ. राजेंद्र गोसावी, कनिष्ठ महाविद्यालयाचे उप प्राचार्य उन्हे मंजाबापू, कार्यालयीन प्रबंधक गणेश देशमुख, वरिष्ठ लिपिक प्रफुल तनपुरे, कार्यालयीन सेवक संदीप भांड, अशोक बिगडगर, संजय गुलदगड यांनी कौतुक केले.

17 वर्षे मुले - गाडे चैतन्य सचिन, शेख साद फारुख, भोंगळ हर्षद अशोक, पठाण अन्वर समीर, आढाव अमृत सोपान, थोरात विठ्ठल शिवाजी, दरंदले अथर्व अनिल, सय्यद समद समीर, बाचकर तुषार शिवाजी, बाचकर ऋषिकेश भाऊसाहेब, सोळसे अजय अप्पासाहेब, बलसाने प्रथमेश दीपक, शिंदे साईराज प्रवीण, लाड दीपक अशोक, बर्डे अजिंक्य सिताराम, शेख सुभान अकबर, भामरे हर्ष राजेंद्र, संकेत बाबासाहेब पडागळे, भागवत आदित्य मंगेश इत्यादी खेळाडूंचा समावेश होता. या गुणवंत खेळाडूंना श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अरुण बाबुराव तनपुरे पाटील तसेच संस्थेचे उपाध्यक्ष ज्ञानेश्वर भास्कर कोळसे पाटील व जनरल सेक्रेटरी हर्ष अरुण तनपुरे पाटील यांनी कौतुक करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## साहित्य संमेलनामुळे समाज व राष्ट्र बांधणीचा मार्ग उन्नत

**प्रा. शरणकुमार लिंबाळे**

**सातारा : हॅलो प्रभात**



अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलने ही लेखक, वाचक व पुस्तकांचा सांस्कृतिक मेळा असून त्यातून समाज व राष्ट्र बांधणीचा मार्ग उन्नत होत असतो, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक प्रा. शरणकुमार लिंबाळे यांनी केले. येथील छत्रपती शाहू स्टेडियममध्ये होणाऱ्या ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या मंडप उभारणीचा शुभारंभ सार्वजनिक बांधकाम मंत्री व स्वागताध्यक्ष शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रा. लिंबाळे यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून करण्यात आला. यावेळी अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष मिलिंद जोशी, कार्यवाह सुनीता राजे पवार, कोषाध्यक्ष विनोद कुलकर्णी यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. रसिकांशी संवाद साधताना प्रा. लिंबाळे म्हणाले की, साहित्य संमेलने लोकहितवादी व न्यायमूर्ती गोविंद रानडे यांच्या प्रेरणेतून सुरू झाली असून समाजसुधारणेच्या उद्देशाने त्यांची परंपरा पुढे चालत आहे. लेखक व वाचक यांचे नाते दृढ होण्यासाठी साहित्य संमेलने महत्त्वाची भूमिका बजावतात. पुस्तकांवर विश्वास ठेवून समाज व राष्ट्र अधिक सुंदर करण्याचे कार्य साहित्य करत असते, असेही त्यांनी सांगितले. यावेळी मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी साताऱ्यातील ९९ वे साहित्य संमेलन साचेबद्धपणा मोडणारे व साहित्यकेंद्री असणार असल्याचे सांगून सातारकरांनी संमेलनाच्या यशस्वीतेसाठी योगदान द्यावे, असे आवाहन केले.

## विशाल अगरवालसह ९ आरोपींचा जामीन फेटाळला

**पुणे : हॅलो प्रभात**

अल्पवयीन मुलाच्या रक्ताचे नमुने बदलल्याप्रकरणी आरोपींकडून साक्षीदारांवर प्रभाव टाकण्याबरोबरच पुराव्यामध्ये छेडछाड करण्याची शक्यता आहे, ही बाब विशेष सरकारी वकील शिशिर हिरे यांनी निदर्शनास आणून दिल्याने विशाल अगरवाल त्याच्यासह ९ आरोपींचा जामीन अर्ज मुंबई उच्च न्यायालयाने मंगळवारी फेटाळला. कल्याणीनगर भागात 'पोर्शे' कार भरधाव वेगाने चालवून अल्पवयीन मुलाने दोन तरुणांना उडविले. या प्रकरणात गुन्हेगारी कट रचणे, पुरावे नष्ट करणे आणि रक्ताचे नमुने बदलणे या आरोपाखाली गुन्हा दाखल केला होता. यात मुलाचे आई-वडील विशाल व शिवानी अगरवाल, अरुणकुमार सिंग, अश्पाक मकानदार, अमर गायकवाड, आदित्य सूद, आशिष मित्तल, अतुल घटकांबळे, ससूनच्या आपत्कालीन विभागाचा तत्कालीन मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. श्रीहरी हाळनोर आणि न्यायवैद्यक विभागाचा तत्कालीन प्रमुख डॉ. अजय तावरे यांना अटक करण्यात आली. त्यानंतर आरोपींची येरवडा कारागृहात रवानगी करण्यात आली. या प्रकरणात अल्पवयीन मुलाची आई शिवानी अग्रवाल हिला महिला असल्याकारणाने मुंबई उच्च न्यायालयाने आधीच अंतरिम जामीन दिला आहे.

# जुन्नर वन विभागात आता पर्यंत ६८ बिबट पकडले

- पिंजरे आणि इतर उपायाचा होतोय फायदा:- जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी
- सर्वात कमी काळात एवढ्या मोठ्या प्रमाणात बिबटे पकडले

**जुन्नर : हॅलो प्रभात**



जुन्नर वन विभागात बिबटयाचा प्रादुर्भाव वाढल्याने, तो कमी करण्यासाठी विविध उपाययोजना करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने १३ कोटी रुपये दिले. त्यातून मोठ्या प्रमाणात पिंजरे करण्यात आले, त्या पिंजऱ्याच्या मदतीतून आता पर्यंत ६८ बिबटे वन विभागाने पकडले आहेत.आज पर्यंत एवढ्या कमी काळात एवढे बिबटे वन विभागाने पकडल्या मुळे बिबटे आणि मनुष्य संघर्ष येत्या काळात संपविण्यासाठी हे महत्वाचे पाऊल ठरत असल्याची भावना व्यक्त करून यात उपवन संरक्षक प्रशांत खाडे व महादेव मोहिते यांच्या विशेष प्रयत्न असल्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी अधोरेखित केले.

जुन्नर वन विभागात जुन्नर, ओतूर, शिरुर, घोडेगाव, मंचर, राजगुरुनगर आणि चाकण वनपरिक्षेत्राचा समावेश होतो. बिबट हल्ल्यात सन २०२५/२६ या वर्षात ५ नागरिकांचा मृत्यू असून त्यांना ६५ लाख रुपये, ५ नागरिक जखमी झाले असून त्यांना २ लाख १८ हजार ९६४ रुपये,१ हजार ६५७ जनावरांचा मत्यू झाले असून याकरिता १ कोटी ६१ लाख १६ हजार ८८९ रुपये तसेच १७ हेक्टर ७ आर पीकांचे नुकसान झाले असून ९ लाख ७९ हजार ९०० रुपये असे मिळून २ कोटी ३८ लाख १५ हजार ७५३ रुपये इतकीनुकसान भरपाई अदा करण्यात आली आहे. जुन्नर वनविभागाकडून मानव व बिबट संघर्ष टाळण्या बरोबरच वन्यप्राणी बिबटचे व्यवस्थापन होण्याकरिता उपाययोजना करण्यात येत आहे. सन २०२०/२१ ते २०२५/२६ या कालावधीत १८५ बिबट-बछडे पुनर्मिलन करण्यात आले आहे. गावांमध्ये वनकर्मचाऱ्यांनामार्फत गस्त,नागरिकांचे प्रबोधन, स्थानिक लोकांच्या सहभागातून जलद बचाव पथकांची निर्मिती, त्यांच्याकडून गस्त व प्रबोधन करण्यात येत आहे. कलापथक यांचे माध्यमातून वेगवेगळ्या गावांमध्ये व शाळांमधून सुमारे ४० कार्यक्रम करण्यात आले असून व विषय प्राविण्य असणारे सौमित्र यांचे मार्फत वेगवेगळ्या ५० गावांमध्ये विभागातील योजना तसेच बिबट जनजागृती चे विशेष वर्ग ग्रामपंचायत पद अधिकारी यांचे सह घेण्यात आले आहेत.

बिबट्याच्या हल्ल्यांपासून घ्यावयाच्या काळजी घेण्याबाबत चे माहिती देणारे पोस्टर्स, घडीपत्रके,कार्यशाळा आयोजन करण्यात आले आहे.बचाव पथकाद्वारे वन्यप्राणी रेस्क्यू करण्यासाठी पथकातील सदस्य तसेच माणिकडोह बिबट निवारा केंद्रातील पथक यांच्या समन्वयाने वन्यप्राणी रेस्क्यू करण्याची कार्यवाही करण्यात येते. प्राथमिक बचाव पथकातील एकूण ४०० सदस्य कार्यरत आहेत.अतिसंवेदनशील गावांत २४ X७ जनजागृती करण्यासाठी स्थानिक तरुणांच्या माध्यमातून पिंपरखेड,न्हावरा,भीमा कोरेगाव ता:-शिरुर,आळे व नगदवाडी, जुन्नर ता:- जुन्नर,व गावडेवाडी ता:- आंबेगाव या ठिकाणी 'बिबट कृती दल' बेस कॅम्प स्थापन करण्यात आलेले आहेत.

यामुळे शिरुर तालुक्याच्या पश्चिम भागातील व आंबेगाव,जुन्नरच्या पूर्व भागातील मानव-बिबट संघर्ष मागील २ वर्षात मोठ्या प्रमाणात नियंत्रित झाला आहे.